थोडक्यात

लाच घेताना विद्युत वितरण कंपनीचा लिपिक जाळ्यात

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । ७ हजार रुपयांची लाच घेताना विद्युत वितरण कंपनीच्या लिपिकास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे. समाधान त्र्यंबक हिवाळे (रा. प्लॉट नंबर १५, सारथी अपार्टमेंट, नरहरी नगर, पाथर्डी ,नाशिक) उच्च स्तरीय लिपिक , मनमाड, म. रा. वि.वि. कंपनी असे लाच घेणाऱ्या लिपिकाचे नाव आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, यातील तक्रारदार हे बाह्य स्त्रोत तंत्रज्ञ म्हणून काम करतात. तक्रारदार व त्याचे तीन मित्र असे यांची बदली एका विभागातून दुसऱ्या विभागात करण्यासाठी प्रत्येकी तीन हजार असे बारा हजार रुपये असे तक्रारदार यांच्याकडून मागितले होते. बारा हजार पैकी पाच हजार तक्रारदार यांच्या मित्राने काही दिवसापूर्वीच फोन पे केले होते उर्वरित ७००० रुपयांसाठी हिवाळे यांनी तक्रारदार याच्याकडे तगादा लावला होता. आज तक्रारदार यांनी ला.प्र. वि नाशिक येथे संपर्क साधून तक्रार केली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने कारवाई केली. हिवाळे यांनी लाचेची मागणी करून लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक शर्मिष्ठा वालावलकर, अपर अधीक्षक माधव रेड्डी, उप अधीक्षक नरेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोनी. निलिमा सविता केशव डोळस, पोह. संदीप वनवे, पो.ना. संदीप हांडगे, पो. शि. सुरेश चव्हाण यांनी केली.

दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या चौघांना अटक

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । अंधाराचा फायदा घेऊन दरोडा घालण्याच्या उद्देशाने कटावणी, दोरी, स्क्रू ड्रायव्हर आदी साहित्य घेऊन फिरणाऱ्या चौकडीला पोलिसांनी अटक केली आहे. याबाबत पोलीस हवालदार विष्णू गोसावी यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, की आरोपी शंकर श्यामराव कापसे (वय ३४, रा. वडवणी मार्केट, अंबरनाथ, जि. ठाणे), विकास सुधाकर पटेकर (वय ३०, रा. संत कबीरनगर, गंगापूर रोड, नाशिक), अफजल हुसेन सय्यद (वय २९, रा. भगूर, ता. जि. नाशिक) व दोन अनोळखी इसम हे सर्व जण काल (दि. २९) मध्यरात्री दीड वाजेच्या सुमारास चेहेडी पंपिंगकडे जाणाऱ्या रस्त्यावर मातेश्वरी अंगण कन्स्ट्रक्शन्सजवळ दरोडा घालण्याच्या उद्देशाने एक लोखंडी कटावणी, दोरी, मिरची पावडर, स्क्रू ड्रायव्हर असे साहित्य आपल्या कबजात अंधाराचा फायदा घेऊन संशयास्पद स्थितीत आढळून आले. या प्रकरणी नाशिकरोड पोलिसांच्या पथकाने कारवाई करून या सर्व दरोडेखोरांना अटक केली आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सूर्यवंशी करीत आहेत.

होर्डिंग कोसळल्यास 'एसटी' जबाबदार! महामंडळाच्या जागेवरून पोलिसांना पत्र

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । अत्यंत धोकादायक स्थितीत असलेली रविवार कारंजा येथील यशवंत मंडई पावसाळ्यात पडल्यास भाडेकरूंना जबाबदार धरण्याची नोटीस महापालिकेने काढल्यानंतर आता त्यापाठोपाठ एसटी महामंडळाविरोधातदेखील महापालिकेने पत्र दिले आहे. महामंडळाच्या जागेतील अनधिकृत होर्डिंग कोसळून दुर्घटना घडल्यास एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरून गुन्हा दाखल करा असे पत्र सरकारवाडा. मुंबई नाका व पंचवटी पोलिसांना पाठविले. शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या यशवंत मंडई इमारत धोकादायक स्थितीत आहे. पावसाळ्यात कोसळल्यास व त्यातून वित्त व जीवितहानी झाल्यास महापालिका जबाबदार राहणार नसल्याचे स्पष्टीकरण नोटिशीद्वारे दोन दिवसापूर्वी देण्यात आले. त्याचबरोबर मंडईत येणाऱ्या ग्राहकांची जबाबदारीदेखील संबंधित भाडेकरूंवर टाकल्यानंतर महापालिकाप्रशासनपावसाळ्यात घडणाऱ्या दुर्घटनेबद्दल क्शन मोडमध्ये आल्याचे दिसून येत आहे. आता महापालिकेच्या जाहिरात व परवाने विभागाने होर्डिंगवरून एसटी महामंडळाला धारेवर धरले आहे. मुंबईतील घाटकोपर येथील छेडानगरमध्ये १२० बाय १२० आकाराचे भले मोठे होर्डिंग कोसळून १७ जण ठार झाले. या दुर्घटनेनंतर राज्यातील आपत्ती व्यवस्थापन विभाग अलर्ट मोडवर आला.

नाशिक महापालिकेनेदेखील शहरातील सर्व होर्डिंगचे फेरसर्वेक्षण करण्याच्या सूचना दिल्या. नाशिक महापालिकेमार्फत मागील वर्षी होर्डिंग्जचे ऑडिट झाल्याने अनधिकृत असे होर्डिंग्ज आढळले नाही. मात्र सर्वेक्षणात पंचवटी बस डेपो येथे पाच, जुने सीबीएस डेपो येथे चार व महामार्ग बसस्थानक परिसरात चार असे एकूण तेरा होर्डिंग्ज अनधिकृत व धोकादायक स्थितीत आढळले. त्यामुळे महापालिकेच्या जाहिरात व परवाना विभागाने एसटी महामंडळाला नोटीस बजावली होती. अनधिकृत व धोकादायक होर्डिंग तातडीने हटवावे, अशा सूचना दिल्या. मात्र एसटी महामंडळाकडून होर्डिंग्ज हटविण्यासाठी दोन दिवसांची मुदत मागून घेण्यात आली. महापालिकेकडून मुदत दिली मात्र आठ दिवसांपेक्षा अधिक कालावधी उलटला तरी अनधिकृत होर्डिंग काढले गेले नाही. त्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतीच आपत्ती व्यवस्थापन आढावा बैठक घेतली. त्यात दुर्घटना घडेल अशा बाबी टाळण्याच्या स्पष्ट सूचना आहेत. त्याअनुषंगाने महापालिकेत पंचवटी पोलिस ठाणे, सरकारवाडा तसेच मुंबई नाका पोलिस ठाण्याला पत्र पाठवून अनधिकृत होर्डिंग कोसळल्यास महापालिकेची जबाबदार राहणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. दुर्घटना घडल्यास एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरावे व त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा, असे पत्र दिले आहे. एसटी महामंडळाच्या जागेत असलेले धोकादायक व अनधिकृत होर्डिंग हटविण्यासाठी महापालिकेने पुढाकार घेतला आहे. सदर होर्डिंग्ज महापालिका हटविणार असून त्याचा खर्च व त्यावरचा दंड एसटी महामंडळातून वसूल करणार आहे. होर्डिंग हटविण्या दरम्यानच्या कालावधीमध्ये दुर्घटना घडल्यास महापालिका जबाबदार राहणार नसल्याचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने दिवाबत्ती खांब आदी यंत्रणेबाबत दक्षता घेण्याचे मनपाचे आवाहन

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । नाशिक महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात नागरिकांच्या सुरक्षिततेकरिता मनपामार्फत महानगरपालिका इमारती, सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यावर प्रकाश व्यवस्थेकरिता दिवाबत्तीची यंत्रणा उभारण्यात आली आहे. या दिवाबत्ती प्रकाश व्यवस्थेची देखभाल दुरुस्तीचे काम महानगरपालिकेमार्फत आवश्यकतेप्रमाणे करण्यात येते. मात्र पावसाळ्यातील संभाव्य दुर्घटना लक्षात घेऊन विशेष काळजी घेण्याचे आवाहन महानगरपालिकेच्या विद्युत विभागाने नाशिककरांना केले आहे. मनपाच्या इमारत व दिवाबत्तीचे खांबामधून मनपाकडून दिवाबत्तीसाठी ३ फेज ४४० व्होल्टचा वीजपुरवठा केलेला असतो. त्याची पॉवर लक्षात घेता येत्या पावसाळ्यात नागरिकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने दिवाबत्ती खांब व यंत्रणेची छेडछाड करु नये, खांबाला व फिडर पिलरला स्पर्श करू नये अथवा विनापरवाना विद्युत पुरवठा घेऊ नये, जनावरे विद्युत दिव्यांच्या खांबाला बांधू नये, जंक्शन बॉक्सवर पाय ठेवून खांबावर चढू नये, कपडे वाळवण्याकरीता पोलच्या तारांना बांधु नये, कोणत्याही बांधकामामध्ये पोल घेऊ नये, पोलला फ्लेक्स अथवा होर्डिंग लावू नये, तसेच पोलच्या संपर्कात येणार नाही, याची काळजी घ्यावी. कुठल्याही प्रकारची केबल आणि तारा खांबावरून ओढू नये. अशा प्रकारच्या कृत्यामुळे संबधित नागरिकांच्या जीवितास धोका किंवा जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा प्रकारच्या कृत्यामुळे कोणत्याही प्रकारची वित्त व जीवितहानी झाल्यास नाशिक महानगरपालिका अशा घटनेस जबाबदार राहणार नाही, याची सर्व संबधित नागरिकांनी नोंद घ्यावी, असे विनंती वजा आवाहन नाशिक महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडून पावसाळ्यापूर्वीच्या कामांबाबत दक्षता घेण्याच्या दृष्टीने नागरिकांना करण्यात आले आहे.

शहर पोलिसांनी केला जळगाव मधील दरोड्याचा यशस्वी तपास

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव येथील दरोड्याच्या गुन्ह्याचा तपास नाशिक शहरातील पोलीस हवालदार मनोहर शिंदे यांनी लावून सुमारे पाऊणे दोन किलो सोन्यासह चार जणांना ताब्यात घेतले आहे. प्रथमच जिल्ह्याबाहेर शहर पोलिसांनी जाऊन मोठा गुन्हा उघडकीस आणण्याचा प्रकार घडला. तपास केलेल्या हवालदार शिंदे यांचे कौतुक होत आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यातील मेहुणबारे पोलीस ठाणे हद्दीत दरोडा व चोरीचा गुन्हा घडून सुमारे लाखो रुपयांचा मुद्देमाल गेला होता. यात सोन्याच्या दागिन्यांचा समावेश होता. चाळीसगाव व जळगाव पोलिसांकडून या गुन्ह्यांची उकल होत नव्हती, म्हणून चाळीसगाव येथील अप्पर पोलीस अधीक्षक कविता नेरकरपवार यांनी नाशिक शहर गुन्हे पोलीस उपायुक्त यांना पत्र देऊन पोलीस हवालदार मनोहर शिंदे यांना तपासाकामी पाठवण्या बाबत विनंती केली होती.

नाशिक शहर पोलिसात दाखल होण्यापूर्वी पोलीस हवालदार मनोहर शिंदे यांनी जळगाव जिल्ह्यात अनेक चोरी, दरोड्यांच्या गुन्ह्यांचा यशस्वी तपास केल्याचे पाहता त्यांना जिल्हा बाहेर तपासकामी निवडले गेले. युनिट २ मध्ये कार्यरत असलेल्या हवालदार मनोहर शिंदे यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी करून त्या काळच्या खबरी व रेकॉर्ड वरचे गुन्हेगार तपासले. ज्या पद्धतीने मेहुणबारे पोलीस ठाण्यात गुन्हा घडला त्याची प्रथमिक माहिती घेऊन व गुन्हा झाल्याच्या पद्धतीचे निरीक्षण करून अशा पद्धतीचे गुन्हे करणारे आरोपी हे मध्यप्रदेश मधील नंदिया, धैली, सातपुडा येथील असल्याचे निरीक्षण केले.

जळगाव पोलिसांमधील अधिकारी, कर्मचारी यांची मदत घेऊन पोलीस हवालदार मनोहर शिंदे यांनी मध्यप्रदेश गाठून डोंगर दऱ्या पार करून जीवाची बाजी लावून त्या ठिकाणी तपास करून गुन्हा करणाऱ्या चार आरोपींना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी केली. त्यांच्याकडून सुमारे १८२ ग्रॅम सोन्याचे दागिने व गुन्ह्यात वापरलेले वाहन असा सुमारे १६ लाख ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला. या आरोपींकडून जळगाव जिल्ह्यात घडलेल्या गुन्ह्यांची उकल होण्याची दाट शक्यता आहे.

शहरातून दोन मुलांसह एका मुलीचे अपहरण

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । तीन घटनांमध्ये अपहरणाचा पहिला प्रकार पंचवटी परिसरात घडला. फिर्यादी यांचा मुलगा घराच्या परिसरात असताना अज्ञात इसमाने या मुलाला कशाचे तरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेत त्याचे अपहरण केले. बराच वेळ होऊनही मुलगा घरी आला नाही म्हणून त्याचा शोध घेतला; मात्र तो मिळून आला नाही. या प्रकरणी पंचवटी पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मेमाणे करीत आहेत. दुसरा प्रकार शिवाजीनगर येथे घडला. फिर्यादी हे सातपूर येथील शिवाजीनगर येथे राहतात. दि. २७ मे रोजी सकाळी साडेसात वाजेच्या सुमारास त्यांचा मुलगा घरी होता. त्यावेळी अज्ञात इसमांनी या मुलाला कशाचे तरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेत त्याचे अपहरण केले. मुलगा घरी परतला नाही म्हणून त्यांनी मुलाचा शोध घेतला; परंतु मुलगा मिळून आला नाही. या प्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस नाईक दिंडे करीत आहेत. अपहरणाचा तिसरा प्रकार फुलेनगर येथे घडला. फिर्यादी हे काही कामानिमित्त बाहेर गेले असता त्यांची मुलगी घरी एकटीच होती. अज्ञात इसमाने या मुलीला कशाचे तरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेत तिचे अपहरण केले. या प्रकरणी पंचवटी पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मेमाणे करीत आहेत.

एल&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय: एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरूम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
CIN No.: L67120MH2008PLC181833
शाखा कार्यालय: नाशिक

L&T Finance

तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 [54 चा 2002] अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक ई-लिलावाद्वारे'' ''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा ई-लिलाव करीत आहेत.

कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	भौतिक ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 30.05.2024 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. संजय जयवंत गायकवाड 2. ग्रेसी संजय गायकवाड	मालमत्तेचा प्रत्येक आणि सर्व भाग, पत्ता: फ्लॅट नं.B-6, स्टिल्ट फ्लोअरवर, क्षेत्रफळ 80.28 चौरस मीटर्स चटई, ''शाह'ज साई रेसिडंसी'' येथे असून सोबत कार पार्किंगची जागा आहे, जी जमीनीचे क्षेत्रफळ 2563.133 चौरस मीटर्सवर एस.नं.221/B पैकी एक असून क्षेत्रफळ 3600.00 चौरस मीटर्स आहे, गावाचे नाव संसारी, तालुका आणि जिल्हा नाशिक, महाराष्ट्र, आणि त्याच्या सीमा अशा: सीमा: पूर्व - फ्लॅट नं. A-6; पश्चिम - पायऱ्या; उत्तर - मार्जिनल स्पेस; दक्षिण - मार्जिनल स्पेस	H184921606210520 38 आणि H184921706211148 23	27 एप्रिल 2024	रु. 2,79,956.40	रु. 38,90,027.12	रु. 27,99,564	आधी अपॉइंटमेंट घेऊन कामकाजाच्या सर्व दिवशी	10.07.2024 रोजी सकाळी 10 ते सायंकाळी 5:30

सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **09/07/2024** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही..
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **10/07/2024** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **11/07/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहितीसाठी, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना संपर्क करावा म्हणजे मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहिती, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना म्हणजे **''नाव - शेखर काळे, संपर्क क्रमांक 9823271111, ऑफिस: एल&टी फायनान्स लि. - ऑफिस क्रमांक 301, तिसरा मजला, जेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुल जवळ, शिवाजी नगर, पुणे - 411005, आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स लि. - ऑफिस: 6वा मजला, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीस शोरूमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.''** या पत्त्यावर संपर्क साधावा. ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी बोली/प्रस्ताव स्विकारू/नाकारू/बदल/रद्द करु शकतात किंवा कोणतेही कारण न देता आणि पूर्वसूचना न देता ई-लिलावपुढे नेऊ शकतात.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 31.05.2024
ठिकाण: नाशिक

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
(३१ मे १७२५-१३ ऑगस्ट १७९५)

राजमाता
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
यांना त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त
विनम्र अभिवादन!

www.mahasamvad.in | /MahaDGIPR | /MaharashtraDGIPR
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय - महाराष्ट्र शासन

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, **मुख्य संपादक** अशोक विठ्ठल सोनवणे यांनी शितल प्रिंटर्स, प्लॉट नं. ६०, भूषण नगर, केडगाव देवी, अहमदनगर ४१४००१ (महाराष्ट्र) येथून छापून शॉप नं. २, तिसरा मजला, बळवंत प्लाझा, वकील वाडी, हॉटेल पंचवटीच्यासमोर, नाशिक - १, पिन - ४२२००१ येथे प्रकाशित केले. ✻ **व्यवस्थापकीय संपादक** - रंजन साळवी. फोन नं. (०२५३) २३१०६०० RNI : MAHMAR/2011/41224. EMAIL : lokmanthan.nashik2498@gmail.com (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील.)